॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# जनसंपर्क विभाग

जळगाव दि. २५ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील रा.से.यो. विभाग, युवा व क्रीडा मंत्रालय, नवी दिल्ली आणि रा.से.यो. प्रादेशिक संचालनालय यांच्या संयुक्त विद्यमाने ३० नोव्हेंबर ते ६ डिसेंबर या कालावधीत राष्ट्रीय एकात्मता शिबीर होणार असून यामध्ये ११ राज्यातील एकूण २०० विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

विविध राज्यातील सामाजिक, सांस्कृतिक व खाद्य संस्कृती आदान प्रदान करणे तसेच एक भारत श्रेष्ठ भारत ही भावना जोपासण्याचे काम या राष्ट्रीय एकात्मता शिबीरातून होत असते. त्याचाच एक भाग म्हणून हे शिबीर विद्यापीठात होणार आहे. महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, केरळ, गोवा, मध्यप्रदेश, कर्नाटक, आसाम, तेलंगणा, ओरीसा आणि तामिळनाडू या राज्यातून एकूण २०० रा.से.यो. स्वयंसेवक या शिबीरात सहभागी होतील. याशिवाय १५ कार्यक्रम अधिकारी सहभागी होणार आहेत. एका राज्यातील पाच विद्यार्थी व पाच विद्यार्थिनी आणि महाराष्ट्राच्या अकृषी विद्यापीठातील विद्यार्थ्यांचा यात सहभाग असेल. दिवसभराच्या या शिबीरात बौध्दीकसत्र, सांस्कृतिक कार्यक्रम, स्पर्धा आणि गटचर्चा असे नियोजन करण्यात आले आहे. अशी माहिती रा.से.यो.चे संचालक डॉ. सचिन नांद्रे यांनी दिली.

**बातमी नं. २**

जळगाव दि. २५ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षा मार्फत झालेल्या परीसर मुलाखतीमध्ये विद्यापीठाच्या बी.टेक. केमीकल इंजिनिअरींगच्या दोन विद्यार्थ्यांची गेक्स्कॉन इंडिया प्रा.लि. पुणे या नामांकित कंपनीमध्ये निवड झाली आहे.

निकीता पाटील व कल्पेश राणे या दोन विद्यार्थ्यांची याच कंपनीत इंटर्नशिप पूर्ण झाल्यानंतर ऑनलाईन मुलाखत घेण्यात आली. कंपनीचे उपाध्यक्ष सत्य मंगीपुडी, व्यवस्थापक अनिल अव्हरे व गोविंद पाटील यांनी मुलाखत घेतली. या दोन्ही विद्यार्थ्यांना ३.६० वार्षिक वेतन देण्यात आले. कक्षाचे उपसमन्वयक डॉ. उज्वल पाटील यांनी मुलाखतीचे व्यवस्थापन केले. कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, संचालक प्रा. जे.बी. नाईक, समन्वयक प्रा. रमेश सरदार यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

............................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: २५ ऑक्टोबर, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी